# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-१७१/२०२३

**अपिलार्थी, श्री.मच्छिंद्र पांडुरंग कवळे,**
**घर नं. १३७३, मु.पो.आवास, ता.अलिबाग,**
**जि.रायगड ४०२ २०८.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, ग्रामपंचायत विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग, शिवतीर्थ, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, अलिबाग, जि.रायगड ४०० २०१.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग, शिवतीर्थ, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, अलिबाग, जि.रायगड ४०० २०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक** : २१.४.२०२६

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १८.६.२०२२ | २८.७.२०२२ | ५.८.२०२२ | १०.११.२०२२ |

अपिलार्थी यांनी दि.२७.१२.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "माहिती नाकारल्याने." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २१.४.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. अंजली वर्तक, सहा. प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग तसेच विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. महेंद्र दामोदर म्हात्रे, सहा. गट विकास अधिकारी (ग्रा. पं), ग्रामपंचायत विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.रायगड यांचें उच्च न्यायलयातील प्रतिज्ञापत्रानुसार ग्रामपंचायत विभागातील कर्मचाऱ्यांवर केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर तपशिल मिळणेबाबत.) "*

*"(वरील विषयांकित प्रकरणी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. रायगड यांनी मा. उच्च न्यायालयात सादर केलेल्या रिट पिटीशन नं. ५३३५/२०२२ मध्ये सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार ग्रामपंचायत विभाग (ग्रामविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, गट विकास अधिकारी इ.) मधील दुय्यम कर्मचारी यांना पाठविलेल्या नोटीसा, खातेनिहाय चौकशी, कारणे दाखवा नोटीसा व केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर तपशिल साक्षांकित प्रती.)"*

तद्‌नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "विहित मुदतीत माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थींनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१०.११.२०२२ रोजी सुनावणी घेऊन, "दि.१७.१०.२०१४ च्या परिपत्रकान्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार वैयक्तिक स्वरूपाची माहिती पुरविणे बंधनकारक नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे." असा निर्णय देऊन अपिल निकाली काढले आहे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांना दि.२८.७.२०२२ रोजीच्या पत्रान्वये असे कळविण्यात आले होते की, त्यांनी मागणी केलेली माहिती ही शासन परिपत्रक दि.१७.१०.२०१४ अन्वये वैयक्तिक स्वरूपाची माहिती असल्याने ती पुरविणे बंधनकारक नाही.

याविरूध्द करण्यात आलेल्या प्रथम अपिलामध्ये तत्कालीन प्रथम अपिलिय अधिकारी यांनी दि.१०.११.२०२२ रोजी सुनावणी घेऊन वर नमूद केल्याप्रमाणे आदेश पारित केले.

अपिलार्थी यांना आजच्या सुनावणीची सूचना प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. सबब, त्यांना सुनावणीची संधी देणे आवश्यक असल्याने सदर प्रकरण पुढील तारखेवर सुनावणीसाठी ठेवण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१९.५.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात येईल.**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ एप्रिल, २०२६

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ